महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.३४८/ **३२००९**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. : ०२२ - ६९४२५१४१
दिनांक: **११.१०.२०२४**

# परिपत्रक

**विषय :-** माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस "वाचनप्रेरणा दिन" म्हणून साजरा करणेबाबत.

**संदर्भ :-** १. परिपत्रक क्र.मासंवि/रवका/न.क्र.३४८/२४८६२ दि.११.१०.२०१७.
२. शासन परिपत्रक क्र. वाप्रेदि-२०२४/प्र.क्र.११४/भाषा-३ दि.१३.०९.२०२४.

*****

महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, यांचे शासन परिपत्रक क्र. वाप्रेदि-२०१७/प्र.क्र.९३/२०१७/भाषा-३ दि.०३.१०.२०१७ च्या अनुषंगाने, संदर्भिय परिपत्रक दि.११.१०.२०१७ नुसार माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस "वाचनप्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्यात येतो.

२. आता, महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, यांचे शासन परिपत्रक क्र. वाप्रेदि-२०२४/प्र.क्र.११४/भाषा-३ दि.१३.०९.२०२४ अन्वये यावर्षी "घेवू या एकच वसा मराठीला बनवू या ज्ञानभाषा" ही मध्यवर्ती संकल्पना निश्चित करुन, माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस "वाचनप्रेरणा दिन" म्हणून साजरा करुन विविध कार्यक्रम आयोजित करण्याकरिता नव्याने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

३. सर्व संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांना विनंती करण्यात येते की, शासन परिपत्रक दि.१३.०९.२०२४ मधील सूचनांचे अवलोकन करुन दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ हा दिवस माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस "वाचनप्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्यात यावा.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत:** शासन परिपत्रक दि.१३.०९.२०२४ .

**( भूषण कुलकर्णी )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/ वित्त व लेखा)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/ क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं-मासंव्यप्र)/(नियोजन)/(मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.

**माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस “वाचन प्रेरणा दिन” म्हणून साजरा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक:वाप्रेदि-२०२४/प्र.क्र.११४/भाषा-३**
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक: १३.०९.२०२४**

वाचा :- १) मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्र.वाप्रेदि-२०१५/प्र.क्र.८९/२०१५/भाषा-३, दि.१४.१०.२०१५
२) मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्र.वाप्रेदि-२०२०/प्र.क्र.९८/भाषा-२, दि.२४.०६.२०२२
३) मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्र.वाप्रेदि-२०२३/प्र.क्र.१००/भाषा-३, दि.११.०९.२०२३
४) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.भासस-२०२४/प्र.क्र.५०/भाषा-१, दि.१४.०३.२०२४.

**शासन परिपत्रक :-**

माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने दिनांक १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस “वाचन प्रेरणा दिन” म्हणून साजरा करण्यात येतो. या निर्णयास अनुसरुन शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व वाचनाची आवड वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने संदर्भाधीन क्र.१ दि.१४.१०.२०१५ च्या शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने "वाचन प्रेरणा दिन" कार्यक्रम साजरा करण्यासाठी सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम इ. कार्यालयांनी देखील विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत दरवर्षी सूचना देण्यात येतात.

२. मराठी भाषेचा प्रचार,प्रसार विकास, जतन, संवर्धन हे मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण आहे. या धोरणास अनुसरुन वेगवेगळे उपक्रम/कार्यक्रम/योजना राबविण्यात येतात. या धोरणाची व्यापकता वाढविण्यासाठी केवळ वरील योजना पुरेशा नसल्यामुळे वाचन प्रेरणा दिन किंवा अन्य कार्यक्रमाचे औचित्य साधून वेगवेगळे कार्यक्रम मराठीच्या प्रचार, प्रसारासाठी आयोजित करण्याच्या सूचना देण्यात येतात.

३. मराठी भाषेसंदर्भात राबवण्यात येणाऱ्या विद्यमान व विस्तारीत उपक्रमांना संदर्भाधीन क्र.४ दि.१४.०३.२०२४ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार वाचन प्रेरणा दिना निमित्त वाचन संस्कृती वृद्धीगत होण्यासाठी विविध प्रकारचे संदेश, व्याख्याने, चर्चासत्रे, अभिवाचन, सामूहिक वाचन, ग्रंथ प्रदर्शन इत्यादी कार्यक्रमासाठी मराठी भाषा विभाग व अधिनस्त कार्यालय यांना कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विस्तारित उपक्रमा अंतर्गत मराठी प्रचार-प्रसार साठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबात सूचित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयानुसार संबंधित आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी विविध कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे आहे.

४. तसेच सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम इ. कार्यालयांनी वाचन प्रेरणा निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करावयाचे आहे.

**५.** या वर्षी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याच्या दृष्टीने नेमके कोणते कार्यक्रम आयोजित करण्यात यावे या दृष्टीने खालीलप्रमाणे सर्वसाधारण सूचना देण्यात येत आहेत.

१. मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण विचारात घेवून सदर वाचन प्रेरणा दिन या उपक्रमाची **"घेवू या एकच वसा मराठीला बनवू या ज्ञानभाषा"** ही मध्यवर्ती संकल्पना निश्चित करुन वाचन प्रेरणा दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

२. सांस्कृतिक कार्यक्रम/चर्चासत्रे / प्रशिक्षण इत्यादी माध्यमातून दरवषी वाचन संस्कृती वाढीस लागण्याच्या विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात . त्याप्रमाणे यावर्षी सुद्धा समाजमाध्यमे / प्रत्यक्षरित्या (ऑनलाईन / ऑफलाईन )पद्धतीने कार्यक्रम करण्यात यावे जेणेकरुन कार्यक्रमाची व्याप्ती वाढून वाचन प्रेरणा दिनाचा संदेश सगळीकडे एकाचवेळी सर्वीकडे प्रसारीत करता येईल. सदर कार्यक्रम आयोजित करतांना मराठी भाषेचा प्रचार,प्रसार विकास, जतन, संवर्धन हे मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण विचारात घ्यावेत.

३. "वाचन संस्कृती" जोपासण्यासाठी सर्वांनी आपले मित्र, कुटुंबातील सदस्य इत्यादींना किमान एक पुस्तक भेट देऊन प्रोत्साहन द्यावे.

४. ललित साहित्य यापुरते कार्यक्रम मर्यादित न ठेवता विज्ञान , तंत्रज्ञान , व्यवस्थापन , पर्यावरण , आरोग्य , संगणक, संकेतस्थळं, अवकाश विज्ञान इत्यादी काळानुरुप विषयांचा देखील समावेश कार्यक्रमात करण्यात यावा .

५. "वाचन संस्कृती" वाढीस लागावी तसेच मराठी भाषेचा प्रचार, प्रसार या उद्दिष्टांसह रोजगाराभिमुख उपक्रमातून जास्तीत जास्त तरूण पिढीला आकर्षित करण्यासाठी खालील विषयांवरील तसेच अशा स्वरूपाच्या अन्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

१) अनुवादलेखन २) व्यावसायिक लेखन ३) पुस्तक निर्मिती व प्रकाशन प्रक्रिया
४) ई-बुक ५) स्व-प्रकाशन ६) युनिकोडचा वापर ७) ऑनलाईन पुस्तक विक्री
८) लेखक प्रकाशन करार ९) संहिता लेखन १०) विश्वकोशाबाबत माहिती कार्यशाळा
११) शॉर्ट फिल्म / डॉक्युमेंटरी लेखन

६. व्हॉटसॲप (WhatsApp),इंटरनेट (Internet), फेसबुक(Facebook), टिव्टर(Twitter) अशा प्रकारच्या सामाजिक प्रसार माध्यमातून वाचन संस्कृती वृध्दींगत होईल /वाचनास प्रेरणा मिळेल असे संदेश प्रसारीत करावेत.

७. मराठी वाचन संस्कृती जपण्यासाठी सर्व उपलब्ध माध्यमांचा जास्तीत जास्त वापर करुन मराठीतील साहित्य स्वयंस्फुर्तीने वाचकांना पाठवावे.

८. सर्व संस्थांनी सोशल मीडियावर "मराठी वाचन कट्टा ' निर्मिती करावी.

९. सर्व संस्थांनी आपल्या स्तरावर मराठी आभासी (digital) / प्रत्यक्ष साहित्य संमेलनाचे आयोजन करावे.

१०. विकीपीडीया सारख्या माध्यमावर मराठीत जास्तीत जास्त लेखन व्हावे याकरीता यासंबधीच्या कार्यशाळा आयोजीत करण्यात याव्यात.

११. वाचन प्रेरणा दिनाच्या औचित्याने मराठी प्रचार/प्रसार/वाचन संस्कृतीच्या विकासासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करावे.

१२. मराठी अभिजात दर्जाबाबत सर्वसामान्यांना माहिती व्हावी यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी विविध कार्यक्रमाचे आयोजन करावे.

१३. वाचन प्रेरणा दिना निमित्त वाचन संस्कृती वृद्धीगत होण्यासाठी विविध प्रकारचे संदेश, व्याख्याने, चर्चासत्रे, अभिवाचन, सामूहिक वाचन, ग्रंथ प्रदर्शन याचे आयोजन करण्यात यावे.

१४. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ , राज्य मराठी विकास संस्था , भाषा संचालनालय , महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या वाचन संस्कृती विषयक कार्यशाळांचे वेळापत्रक जाहिर करून त्याप्रमाणे कार्यक्रम आयोजित करावेत .

१५. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ , राज्य मराठी विकास संस्था , भाषा संचालनालय , महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ यांनी मराठीचा प्रचार / प्रसार प्रभावीपणे कसा करता येईल या विषयावरील तज्ञांच्या कार्यशाळा आयोजित कराव्यात.

१६. वाचन संस्कृती वृद्धीगत होण्यासाठी , मराठी भाषेच्या वापराबाबत जागरुकता निर्माण करण्याकरिता संबंधित कार्यालयांनी संकेतस्थळे, आकाशवाणी, दूरदर्शन, खाजगी दूरचित्रवाहिन्या, एफ.एम.रेडिओ, स्थानिक केबल नेटवर्क, फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप इ. प्रसार माध्यमातून याबाबतचे दृक-श्राव्य संदेश प्रसारित करावेत.

१७. मातृभाषेची महती आणि माहिती, तसेच मातृभाषेचे व्यक्तिगत व समाजजीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने महत्व या विषयांवर विचारमंथनात्मक कार्यक्रम आयोजित करावे.

१८. सकस साहित्याची, नव्या माहितीची, आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाची मराठीतील पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने राज्यभर कार्यक्रम आयोजित करावे.

१९. वाचन संस्कृती वृद्धीगत होण्यासाठी तसेच , न्यायव्यवहार, शासन प्रशासन, प्रसार माध्यमे, केंद्र तथा राज्य शासनाची कार्यालये, इतर अशासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी होणारा मराठी भाषेचा वापर याबाबत जागरूकता वाढविण्यासाठी व्याख्याने , चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे तसेच आधुनिक माध्यमांचा वापर करून कार्यक्रमांचे आयोजन करावे.

२०. आकाशवाणी व दूरदर्शनवरुन सादर करण्यात येत असलेल्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या प्रायोजित कार्यक्रमामध्ये वाचन संस्कृती वृद्धीगत होण्यासाठी मान्यवरांच्या मुलाखती, परिसंवाद आयोजित करावे.

२१. वाचन संस्कृती वृद्धीगत होण्यासाठी मराठी भाषा / साहित्य / कोश वाङ्मय या विषयांवर ऑनलाईन व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजन तसेच तज्ज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखतींचे आयोजन करण्यात यावे.

२२. वाचन संस्कृती वृद्धीगत होण्यासाठी , मराठीच्या प्रचार / प्रसारासाठी अभिनव कल्पना सादर करून त्याप्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

२३. वाचन संस्कृती वृद्धीगत होण्यासाठी विविध मार्गांनी स्वयंप्रेरणेने काम करणाऱ्या व्यक्ती/ संस्था यांच्या कार्यास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या कार्याचा गौरव/ सत्कार करणे.

२४. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार वर्जित प्रयोजने वगळता शासकीय कामकाज १००% मराठी भाषेतून करणे आवश्यक आहे. तर, त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये/सार्वजनिक उपक्रम यांनी मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य आहे. याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

२५. भाषा संचालनालयाने व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने तयार केलेल्या भ्रमणध्वनी उपयोजकाबद्दल (मोबाईल ॲप) तसेच मराठी भाषा विभागाच्या व त्या अंतर्गत कार्यालयांच्या संकेतस्थळाबद्दलची माहिती शाळा व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांपर्यंत प्रसारीत करण्याची जबाबदारी चारही क्षेत्रीय कार्यालयांची राहील.

२६. वरील कार्यक्रम सर्व जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यासाठी जिल्हाधिकारी / महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ , राज्य मराठी विकास संस्था , भाषा संचालनालय , महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ

यांनी खालीलप्रमाणे साहित्य संस्थांची मदत घेऊन त्या साहित्य संस्थांसमोर दर्शविलेलया जिल्ह्यात कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मदत घ्यावी.

| अ.क्र. | जिल्हाधिकारी | साहित्य संस्था |
|---|---|---|
| १. | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर. | महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे |
| २. | जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर. | मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद औरंगाबाद |
| ३. | बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली | विदर्भ साहित्य संघ, नागपूर |
| ४. | रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, ठाणे, पालघर, मुंबई उपनगर, | कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी |
| ५. | कोल्हापूर | दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर |
| ६. | मुंबई शहर | मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई. |

सर्व जिल्हाधिकाऱ्यांना वरीलप्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी भाषा संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि राज्य मराठी विकास संस्था, मुंबई तसेच अ.क्र.२६ येथे दर्शविलेल्या साहित्य संस्थांची मदत घेता येईल.

२७. ग्रंथालये, महाविद्यालये, तंत्रमहाविद्यालये, पदविका संस्था तसेच अखत्यारीतील अन्य संस्थांना वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना उच्च व तंत्र शिक्षण विभागाने संबंधितांना दयाव्यात.

२८. सांस्कृतीक व पर्यटन विभागाअंतर्गत सांस्कृतीक संचालनालयाच्या अखत्यारीतील संस्थांना उदा. फिल्मसिटी गोरेगाव, अखिल भारतीय नाट्य महामंडळ अशा स्वरुपाच्या संस्थांना वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना सांस्कृतीक व पर्यटन विभागाने संबंधितांना दयाव्यात.

२९. शालेय शिक्षण विभागाअंतर्गत शाळा या वाचन संस्कृती वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने एक महत्वाचे माध्यम आहे ही बाब विचारात घेता वाचन संस्कृती वृध्दींगत होण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने त्यांच्या अखत्यारीत्यातील संबंधित संस्थांना वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना द्याव्यात.

३०. महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ यांनी वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना अखिल भारतीय साहित्य महामंडळ तथा सर्व साहित्य संस्थांना द्याव्यात.

३१. नगर विकास विभागाअंतर्गत महापालिका/नगरपालिका वाचन संस्कृती वृध्दींगत होण्यासाठी तथा मराठीच्या प्रचार प्रसारासाठी त्यांच्या अखत्यारीत्यातील संबंधित संस्थांना वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना द्याव्यात.

३२. सर्व मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपआपल्या विभागातील कार्यक्षेत्रातील संबंधितांचे सहकार्य घेऊन हा सोहळा पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी / कर्मचारी यांना सहभागी करुन घ्यावे. तसेच सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत संबंधितांना आवश्यक ते निर्देश द्यावेत.

३३. विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान, समाजविद्या यांच्या कक्षेत येणारे विषय तसेच, महाराष्ट्राची भाषा, संस्कृती आणि इतिहास या विषांयावर मराठीमध्ये ग्रंथरचना करण्याविषयाच्या बहुविध वाङ्मय योजनांच्या परिपूर्तीसाठी चालना देणे, मदत करणे तसेच, ज्ञान आणि संस्कृतीच्या विकासासाठी साधनस्वरुप व आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यातील अद्ययावत प्रगतीची माहिती देणारी, मूलभूत ज्ञान देणारी पुस्तके व अभिजात ग्रंथाची भाषांतरे स्वस्त किंमतीत उपलब्ध करुन देणे साहित्य संस्कृती मंडळाचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार मंडळाने कालानुरुप ललित साहित्य बरोबरच ज्ञान आणि संस्कृतीच्या विकासासाठी साधनस्वरुप व आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान तसेच अन्य नवीन विषयांचा आढावा घेऊन त्याचा अंतर्भाव संस्थेच्या पुस्तक प्रकाशनात करावा.

३४. राज्य मराठी विकास संस्थेने वाचन संस्कृती वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने नवीन उपक्रम सुरु करुन त्याच्या वर्षभराच्या वेळापत्रकानुसार सदर उपक्रम सुरु करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करावा.

३५. विश्वकोश निर्मिती मंडळाने विश्वकोशाच्या नोंदी अद्यावत करण्याच्या दृष्टीने निरंतर प्रशिक्षण कार्यक्रम तथा नोंदीची संख्या वाढविण्यासाठी कार्यक्रम निश्चित करावा व अंमलबजावणीचा अहवाल शासनास सादर करावा.

३६. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार हे मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण आहे. सदर धोरण विचारात घेऊन वरील सूचना तसेच संदर्भाधीन क्र.२, दि. २४ जून, २०२२ च्या शासन निर्णयातील सूचना कार्यक्रम आयोजित करतांना सर्व मंत्रालयीन विभाग तथा मंत्रालयीन विभागअंतर्गत सर्व संबंधित विभागांनी तसेच अन्य सर्व संस्थांनी, मंडळांनी, महामंडळांनी, सार्वजनिक उपक्रम, बँका यांनी विचारात घ्याव्यात.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२४०९१३१९३९५७१२३३ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NITIN JOTIRAM DANGARE

Digitally signed by NITIN JOTIRAM DANGARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MARATHI LANGUAGE DEPARTMENT, 2.5.4.20=2199314143adc352dccd62da8d57c0c437f1857f98da7b40525225bbbd5b59e9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=EF4BF635C99B4893102C08CC8CC543C45250E19DC2A7932C127A2E60D75F7904, cn=NITIN JOTIRAM DANGARE
Date: 2024.09.13 19:40:35 +05'30'

**( नितिन जो.डंगारे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री (मराठी भाषा) यांचे खाजगी सचिव / विशेष कार्यकारी अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
४. मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव, मुंबई,
६. मा.मुख्य सचिव / सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई (पत्राने),
८. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई (पत्राने),
९. प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१०. सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ, विधान भवन, मुंबई,
११. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१२. सर्व मंत्रालयीन विभाग,
१३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना मुद्या क्र. २६ च्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाहीसाठी
१४. सांस्कृतीक व पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना मुद्या क्र. २७ च्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाहीसाठी
१५. नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना मुद्या क्र. २७ च्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाहीसाठी
१६. सर्व विभागीय आयुक्त,
१७. सर्व जिल्हाधिकारी,

१८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१९. महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), मुंबई,
२०. महालेखापाल -२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), नागपूर,
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२३. भाषा संचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२४. संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
२५. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२६. सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
२७. निवड नस्ती / भाषा -३.